प्रेसनोट

दि.०४/०३/२०२०

सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथील महिला पोलीस हवालदारावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक	पुणे घटक
गुन्हा नोंद क्रमांक	सांगवी पोलीस स्टेशन, पुणे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.
कलम	भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७
आरोपीचे नाव व कार्यालय	संगीता विनोद गायकवाड, वय -४८ वर्षे, पद – महिला पोलीस हवालदार ब.नं.२५४, नेमणुक सागवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय. वर्ग - ३,
मागणी केलेली लाचेची रक्कम	३,०००/-
स्विकारलेली लाचेची रक्कम	१,५००/- पहिला हप्ता म्हणून.
थोडक्यात माहिती.	पडताळणी दिनांक :- ०४/०३/२०२० सापळा दिनांक :- ०४/०३/२०२० तक्रारदार यांचे ६० फुटी डी.पी. रोड पिंपळे गुरव येथे भाडेतत्वावर दुकान होते. सदरचे दुकान करारनामा संपून देखील खाली केले नाही म्हणून मूळ मालकाने सांगवी पोलीस स्टेशन येथे तक्रार केली होती. सदर दुकान खाली करण्यासाठी मुदतवाढ देते तसेच मदत करते म्हणून आरोपी लोकसेवक हिने तक्रारदार हिचेकडे ३,०००/- रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी १,५००/- रूपये पहिला हप्ता स्वीकारल्यावर तीस रंगेहात पकडण्यात आले.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

(संजय पाटील)
अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.